



दैनिक **अक्षराज** अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२



वर्ष : ०५ | अंक : ३३४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१५ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# आणखी २३ लाख शेतकऱ्यांना फायदा, शेतकरी कर्जमाफीचं निकष बदललं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने कर्जमाफी योजना आणली आहे. या कर्जमाफीचा राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे कर्जमाफीच्या या योजनेतील एक निकष बदलण्यात आले आहे. या नव्या बदलामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार आहे. या कर्जमाफी योजनेसह नियमित कर्जाची रक्कम भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पैसे देखील मिळणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर याबाबत अतिशय महत्त्वाची माहिती दिली.



आणखी २३ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळणार

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ च्या निकषात सुधारणा करण्यात आली आहे. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची पन्नास हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून, नियमित कर्जमाफी करण्यात आली आहे. सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

मुख्यमंत्री कर्जमाफीबाबत काय म्हणाले?

मी विधानसभेत घोषणा केली होती, आजपर्यंत सर्व कर्जमाफी योजनांमध्ये नगदच्या कर्जमाफी योजनेतील जे पात्र उमेदवार असतात त्यांना अपात्र करण्यात आलं. यावेळी आम्ही त्यांनाही ५० हजारांपर्यंत पात्र करण्याचा निर्णय घेतला होता. पण रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वात सत्तापक्षाचे आमदार मला भेटले आणि त्यांनी विनंती केली की, त्यांनाही २ लाखांची कर्जमाफी द्यावी. म्हणून पहिल्यांदाच राज्याच्या इतिहासात कर्जमाफीमध्ये त्यांचाही समावेश करण्यात आलेला आहे, अशी महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दुसरी जी अट होती २०२६-२७ सालाचे पैसे भरले तर प्रोत्साहनपर पैसे मिळतील. ही २०२६-२७ ची अट आपण काढून टाकलेली आहे. २०२५-२६ सालाचे पैसे ज्यांनी भरले असतील त्यांना प्रोत्साहनपर मदत मिळणार आहे.

### देवेंद्र फडणवीस यांचं राहुल गांधींना उत्तर

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी टीईटी घोटाळ्यावरुन टीका केली आहे. त्यावरही देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं. राहुल गांधींना कल्पना नसेल की सरकारने कारवाई करुन पेपर फोडणाऱ्यांना पकडलं आणि म्हणून ती परीक्षा पुढे नेली. पेपर फुटल्यानंतर आरोपींना पकडलं नाही. त्याआधी ही कारवाई महाराष्ट्र सरकारने आणि आमच्या पोलिसांनी केली आहे. निश्चितपणे पुढची परीक्षा योग्य पद्धतीने व्हावी याचं नियोजन चालू आहे. त्याच्या तारखा देखील लवकरच आम्ही घोषित करणार आहोत. फक्त मला याची कल्पना नाही की, राहुल गांधींनी ट्विट परदेशातून केलं आहे की देशातून केलं आहे. कारण ते बहुतांशवेळी परदेशात असतात. त्यामुळे त्यांना सर्वच माहिती असते असं नाही, असा टोला फडणवीसांनी लगावला.

आपण प्रो ॲक्टिवली कारवाई केली आहे. ज्यांना पकडलं आहे ते आंतरराज्यीय गुन्हेगार आहेत. त्यामुळे या कारवाईतून आपण अनेक राज्यांतील पेपरफूट वाचवण्याचे आपण प्रयत्न केले आहेत. राहुल गांधींनी पहिल्यांदा स्वत:कडे, स्वत:च्या पक्षाकडे आणि स्वत:च्या सरकारकडे पाहावं आणि त्यानंतर बोलावं, अशी टीका फडणवीसांनी केली.

यामुळे काही शेतकरी अपात्र झाले असते. पण ते पात्र झालेले आहेत. मला असं वाटतं की आता देशातील आणि राज्यातील सगळ्यात मोठी कर्जमाफी ५६ लाख शेतकऱ्यांकरता जाहीर केली आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.


३० जुलैपर्यंत कर्जमाफीचे पैसे मिळणार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

शेतकरी कर्जमाफीवर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनीदेखील मोठं वक्तव्य केलं आहे. येत्या ३० जुलै आधी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच जे इनकम टॅक्स भरतात त्यांना कर्जमाफी दिली जाणार नाही, असंदेखील दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं.

ही कर्जमाफी गरीब शेतकऱ्यांसाठी आहे. इनकम टॅक्स भरणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांसाठी नाही. ३० जुलैपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीची रक्कम दिली जाणार आहे, असं दत्तात्रय भरणे म्हणाले.

## रानडुकरांपासून उसाचे पीक वाचविण्यासाठी सोडलेल्या विजेच्या करंटने पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१४, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील फरकंडा शिवारात रानडुकरांपासून उसाचे पीक वाचविण्यासाठी शेताभोवती लावलेल्या तारेला विजेचा प्रवाह सोडल्याने पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी घडली. या प्रकरणी पालम पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फरकंडा येथील महेबूब मदारसाब पठाण (वय ४०) यांनी रानडुकरांपासून उसाचे पीक सुरक्षित राहावे म्हणून शेताभोवती बांधलेल्या तारेला निष्काळजीपणे विजेचा प्रवाह सोडला होता. मात्र, तो वेळेवर बंद न केल्याने मंगळवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास त्यांची पत्नी आशाबी महेबूब पठाण (वय ३५) हिचा त्या तारेला स्पर्श झाला आणि तिला जोरदार विजेचा धक्का बसला.

पत्नीला वाचविण्यासाठी धावलेल्या महेबूब पठाण यांनाही विजेचा धक्का बसल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे फरकंडा परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकऱ्यांनी अशा प्रकारे शेताभोवती विजेचा प्रवाह सोडणे किती धोकादायक ठरू शकते, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

या प्रकरणी मदारसाब नन्हुसाब पठाण (वय ५५, रा. फरकंडा) यांच्या फिर्यादीवरून पालम पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४२/२०२६ नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे करीत आहेत. या प्रकरणातील आरोपी महेबूब पठाण यांचाही घटनेत मृत्यू झाल्याने आरोपीची स्थिती 'मयत' अशी नोंदविण्यात आली आहे.

## स्मार्ट मीटरला खासदारांचा विरोध : खा.वाकचौरे, खा.लंके

### वाढीव वीज बिलाद्वारे ग्राहकांचा खिसा कापण्याचा प्रकार

**जलजीवनचे अधिकारी दोनदा निलंबित करा...**

जिल्ह्यातील जलजीवन योजनेसंदर्भात खासदार निलेश लंके यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. २०२२ मध्ये जिल्ह्यातील ८३० योजनांना मंजुरी मिळाली होती. आता किती टक्के काम पूर्ण झाले आहे? यावर अधिकारी म्हणाले. ८३० पैकी २७४ योजना पूर्ण झाल्या आहेत. ५५६ योजना प्रगतीपथावर आहेत. योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने डिसेंबर २०२८ ची कालमर्यादा घालून दिली आहे. लंके म्हणाले, चार वर्षांत तुम्हाला योजना पूर्ण करता आल्या नाहीत. आता दोन वर्षात योजना पूर्ण होतील का? तुमच्यातले काही अधिकारी दोनदा निलंबित केले पाहिजेत.



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** स्मार्ट मीटर बसवल्याने नागरिकांना वीजबिल वाढवून येत आहे. लोकांचा विरोध, तक्रारी असताना स्मार्ट मीटर बसवण्याचा आग्रह धरु नका. यापूर्वीच्या मीटरपेक्षा आता नागरिकांनी दीड-दोन पट वाढीव बील आहेत. हा प्रकार म्हणजे दिवसाढवळ्या नागरिकांचा खिसा कापणे आहे. त्याम ुळे इथून पुढे स्मार्ट मीटर बसवू नका, अशी मागणी खा. भाऊसाहेब वाकचौरे, नीलेश लंके यांनी महावितरणच्या अधिकार्यांकडे केली. दरम्यान, महावितरण कंपनीच्यावतीने दिलेला खुलासा हा संयुक्तीक नसल्याचे सत्ताधारी भाजपचे आ. विवेक कोल्हे यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दिशा समितीची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी खा. भाऊसाहेब वाकचौरे होते. यावेळी खा नीलेश लंके, आ. विवेक कोल्हे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल आदी उपस्थित होते. यावेळी खा. लंके म्हणाले, स्मार्ट मीटरच्या तक्रारी घेऊन लोक आमच्याकडे येतात. मुख्यमंत्र्यांनी असे मीटर लावू नका, म्हणून सांगितले असताना महावितरणचे अधिकारी कशाला आग्रह धरतात? यावर महावितरणचे अधिक्षक अभियंता रमेश पोवर म्हणाले, जुने मीटरचे बील आणि नवीन मीटरच्या बील एकत्रित आल्याने पहिले बील वाढवून आले आहेत. यासाठी तक्रारदारांची कार्यालयात शिबीर घेऊन दोन्ही मीटरचे प्रात्यक्षिक दाखवून देवू. ग्राम ीण भागात डीपीची गंभीर समस्या आहे.

डीपी जळाल्यानंतर शेतकऱ्यांना तीन -चार महिने नवीन डीपी मिळत नाही. काही डीपीवर अतिरिक्त कनेक्शनचा लोड वाढला आहे. संध्या ग्रामपंचायतीच्या पाणी योजनांचे वीजबिल लाखांत थकले आहेत. त्यामुळे पाणी असून देखील नागरिकांना पाणी मिळत नाही. यापूर्वी शासन ५० टक्के वीजबिल भरत होते. पाणी योजनेच्या वीजबीलात १०० टक्के सवलत द्या, अशी मागणी करत वाकचौरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना लक्ष घालण्याची मागणी केली. यावर जिल्हाधिकारी म्हणाले, शेतकऱ्यांना वेळेत डीपी उपलब्ध होण्यासाठी डीपीडीसीमधून अधिक निधीची तरतूद करण्यात येईल. महावितरणचे अधिकारी म्हणाले, पाणी योजनेत सवलत मिळावी म्हणून प्रस्ताव तयार करून शासनाला पाठविण्यात येणार आहे.

## माथेरान मध्ये पुन्हा बिबट्याचे दर्शन, मन पॉइंट परिसरात कुत्र्याची शिकार सीसीटीव्ही घटना कैद

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१४, माथेरान :** माथेरानमध्ये बिबट्याच्या वावराने पुन्हा एकदा नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल रात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास हनिमून पॉईंटजवळील गणेश सणसगरे यांच्या घराबाहेरील पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला करून त्याची शिकार केली. ही संपूर्ण घटना गणेश सणसगरे यांच्या घराच्या बाहेर बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यानंतरच बिबट्याच्या हालचालींची खात्री झाली.यापूर्वीही सुमारे महिनाभरापूर्वी याच परिसरातील संदीप जाबरे आणि उज्वला चौधरी यांच्या घरातील पाळीव कुत्र्यांची बिबट्याने शिकार केली होती. त्यामुळे या परिसरात बिबट्याचा सातत्याने वावर असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

काही दिवसांपूर्वी माथेरान-दस्तुरी नाका मार्गावरील माऊंटबेरी परिसरातही बिबट्याचे वारंवार दर्शन झाले होते. आता त्याने आपला वावर बदलून लुईझा पॉईंट-हनिमून पॉईंट परिसरात वाढवल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, वनरक्षक जयवंत चिमटे यांनी सांगितले की, माथेरानच्या जंगलात सुमारे २ ते ३ वर्षे वयोगटातील बिबट्याचे तीन बछडे वास्तव्यास आहेत. त्यामुळे नागरिकांनी, विशेषतः रात्रीच्या वेळी, अधिक सतर्क राहावे. जंगलालगतच्या परिसरातील बंगलेधारकांनी तसेच नागरिकांनी स्वतःची व पाळीव प्राण्यांची काळजी घ्यावी. रात्रीच्या वेळी विनाकारण बाहेर फिरणे टाळावे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. सीसीटीव्हीत बिबट्याचे दर्शन कैद झाल्याने परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असून, या घटनेनंतर हनिमून पॉईंट, लुईझा पॉईंट आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने या भागात गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## राम मंदिर देणगीतील गैरव्यवहार विरोधात कॉंग्रेसचा सत्याग्रह

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.१४, चंद्रपूर :** अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील देणगी व दानपेटीतील कथित गैरव्यवहाराच्या निषेधार्थ चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी (दि.१३ जुलै) अंचलेश्वर मंदिर शिव देवस्थान (अंचलेश्वर गेट) येथे रघुपती राघव राजा राम सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले. महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि लोकशाही म ूल्यांचा संदेश देणारे हे आंदोलन मोठ्या उत्साहात व शांततेत पार पडले.

या सत्याग्रहाला खासदार प्रतिभा धानोरकर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे, आ. ॲड. अभिजित वंजारी, आ. सुधाकर अडबाले, शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष शिवा राव पोलशेट्टी, माजी अध्यक्ष विनायक बांगडे, सुभाषसिंग गौर, विनोद दत्तात्रय, माजी शहर अध्यक्ष संतोष लहामगे, संतोषसिंह रावत, दिनेश चोखारे, राजु रेड्डी, महिला जिल्हाध्यक्ष कुंदा जेनेकर, नगराध्यक्ष अरुण धोटे, भाष्कर माकोडे, विजय घरत, अंबिकाप्रसाद दवे, प्रमोद बोरीकर, सुनील खंडेलवाल, मनीष तिवारी, गोपाल अमृतकर, सुनीता अग्रवाल, दिशा रामटेके, प्रेरणा गौर यांच्यासह जिल्हा व शहर कॉंग्रेस तथा कॉंग्रेसच्या सर्व फ्रंटल आर्गनायझेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि देशभक्त, रामभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्याग्रहादरम्यान प्रभू श्रीराम ाचे रघुपती राघव राजा राम, खरा तो एकची धर्म, यासह विविध भजने, पूजन, अर्चन आणि प्रार्थना करण्यात आली. रघुपती राघव राजा राम या भजनाच्या माध्यमातून प्रभू श्रीराम ांच्या नावाने आलेल्या देणगीबाबत पारदर्शकता राखली जावी, श्रद्धेचा मान राखला जावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. यावेळी चंद्रपूर येथील पुरातन अंचलेश्वर मंदिर शिव देवस्थान येथे प्रार्थना करून भगवान श्रीराम मंदिरातील देणगी लुटणाऱ्यांना सदबुद्धी दे अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली. यावेळी कॉंग्रेसच्या वतीने अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील देणगी व दानपेटीतील कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचा तीव्र निषेध करण्यात आला. रामभक्तांनी श्रद्धेने अर्पण केलेल्या रोख रक्कम, सोने आणि चांदीच्या देणगीचा कथित गैरवापर झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच या प्रकरणावर केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांनी मौन बाळगल्याबद्दलही कॉंग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली. रघुपती राघव राजा राम सत्याग्रहाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# संपादकीय

## खरे संकटमोचक

पालघर जिल्ह्यातील वसई, विरारसह अनेक शहरे गेल्या आठवड्यात पाण्यात बुडाली होती. पालघरमधील केळवे रोड उपनगरातील हनुमानपाडा भागात प्रसंगावधान, समर्पण आणि कल्पकता यांचा हृद्य संगम पाहायला मिळाला. सर्वत्र गळ्यापर्यंत पाणी होते आणि त्यात एक गर्भवती प्रसूतीकळांनी व्याकुळ झाली होती. या भागातील आशासेविका, समाजसेवक, रुग्णवाहिका चालक आणि नागरिकांनी घराच्या दरवाजाचेच स्ट्रेचर करून त्यावरून या गर्भवतीला ग्रामीण रुग्णालयापर्यंत नेले व तिथे एका बाळाचा जन्म झाला

गेल्या आठवड्यात पावसाने कहर केला. कनेक्टिंग लिंकच्या दारात दरड कोसळली. वृक्ष उन्मळून पडले. अशावेळी सर्व यंत्रणांना रस्ते म ोकळे करणे, अडकलेल्या जीवांना सुखरूप बाहेर काढणे यास प्राधान्य द्यावे लागते. भर पावसात जिवाची बाजी लावून दरीत उतरणारे, दगड बाजूला करणारे, वृक्षाच्या फांद्या कापू शकणारे श्रमिक विनाविलंब घटनास्थळी हजर करणे, हे म ोठे जिकिरीचे काम असते. ओली झाडे, सरकणारे दगड-धोंडे हे सर्व सांभाळतच अवजड यंत्रणांचा वापर करावा लागतो. घाटामध्ये अपघात झाला की, 'यशवंती हायकर्स'सारखे तरबेज गिर्यारोहक कित्येक वर्षे मदतीला धावून येत आहेत. मृतदेह बाहेर काढण्याचे कामही त्यांनी केले आहे. काही जणांसाठी हे नैमित्तिक कामाचा भाग असते, तर काहींसाठी कर्तव्यभावना. पगारी ड्युटी करणाऱ्यालाही कर्तव्यभावना काही चुकत नाही. परवा अतोनात पाऊस पडत असताना रेनकोट घातलेल्या एक मावशी ओणवे वाकून दोन हातांतील पत्र्यांमध्ये पालापाचोळा गोळा करण्याचे काम करत होत्या. त्यांनी त्यात जराही कुचराई केली असती, तर त्या रस्त्यावर गुडघाभर पाणी तुंबायला वेळ लागला नसता. या कष्टकऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' नाही!

संकटमोचक म्हटले की आजकाल केवळ राजकीय नेतेच लोकांना आठवतात. हे संकटम ोचक आकड्यांची जुळवाजुळव करतात. खऱ्या संकटमोचकांना मात्र सामग्री, श्रम, वेळ, जोखीम आणि कल्पकता यांची मोट बांधावी लागते. प्रसंगी 'एसओपीं'च्या विरोधात जाऊन काम करावे लागते. या सगळ्यात आपली जुगाड जुळविण्याची भारतीय वृत्ती फार उपयुक्त ठरते. २६ जुलै २००५च्या पुरामध्ये मुंबई पोलिसांना त्यांचे वायरलेस नेटवर्क शाबूत ठेवणे अत्यंत आवश्यक होते. त्या वेळी पश्चिम उपनगरात एका मोक्याच्या टेकडीवर असलेल्या टॉवरला विद्युतपुरवठा करण्यासाठी वायरलेस विभागाने पोलिस वाहन विभाग व अन्य ठिकाणच्या मोटारींच्या बॅटरींचा सुयोग्य वापर केला होता. हे ज्या पोलिसांना सुचले, त्यांच्या कल्पकतेला दाद द्यायला हवी. विक्रोळीत एकदा एका मोठ्या कंपनीच्या अखत्यारीतील भुयारी मार्गात एक सामग्रीवाहक ट्रेलर उंचीमुळे अडकून पडला. कुणाला उपाय सुचेना. तेव्हा तेथील शाळकरी मुलांनी क्लृप्ती सांगितली आणि ट्रेलरच्या चाकातील हवा काढल्यावर तो बाहेर निघाला. आयआयटीमध्ये तर ग्रामीण भागात उपयुक्त तंत्रज्ञान उभे करण्यासाठी 'सीटारा' नावाची एक संस्थाच कार्यरत आहे.

सध्या कृत्रिम प्रज्ञेचा बोलबाला आहे. शोधनिबंध लिहिण्यापासून ते अर्कचित्र चितारण्यापर्यंत सर्व काही हे एआय करते; परंतु माणसाऐवजी गटारात उतरून स्वच्छता करणे, भूमिगत टाकीची सफाई, डम्पिंग ग्राऊन्डच्या आगी शमविणे अथवा दुर्गंधी थोपविणे, उघड्या मॅनहोलची वर्दी देणे अशा कोणत्या कामासाठी या एआयला कामाला लावता येईल का? आजकाल झाडे कापण्यापासून ते नारळ उतरवण्यापर्यंतच्या कामांसाठी अनेक यंत्रे – आणि तीही बॅटरीवरची पोर्टेबल यंत्रे – बाजारात येत आहेत. खेदाची बाब म्हणजे यातली बरीच यंत्रे परदेशी असतात. एआय आणि आपली कल्पकता यांचा संगम साधून असे संकटमोचक जुगाड आणता येतील का? अंगावर शिसारी आणणारी आणि जीव धोक्यात घालणारी आपत्कालीन कामे करण्यासाठी एआय मदतीला येईल, तर खरे.

**– समीर कर्वे**

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज ; प्रा.डॉ.एन.डी.पाटील



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा म ोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरम नपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# नीट पेपर फुटल्यावर परिक्षा परत घेतल्या जाते; मग फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका परत का नाही?



भारत लोकशाहीचा देश म्हणून जगप्रसिद्ध आहे. परंतू देशात अलीकडच्या काळात अजब-गजब कहानी घोडेबाजाराच्या माध्यमातून राजकीय वर्तुळात पहायला मिळत आहे.नुकतीच देशात नीट पेपर फुटीचे प्रकार देशभर गाजले.या पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली.या दरम्यान पेपर फुटल्यानंतर सरकारने (शिक्षण विभागाने) दिड-दोन महिन्यात पुन्हा नीटची परीक्षा जाहीर केली व परीक्षा पार पडली.परंतु हाच फार्मुला फ ुटलेल्या आमदार-खासदारांना (राजकीय वर्तुळात) लागू का होत नाही?असे अनेक प्रश्न आज देशाच्या १४५ करोड जनतेच्या मनात भेडसावत आहे.देशातील प्रत्येक व्यक्तीला कल्पना आहे की, राजकीय पुढारी सत्तेसाठी कुठल्याही स्तरावर जायला तयार असतो.यात सर्वसाम ान्यांना काहीही देणेघेणे नसते आणि नाही.परंतु देशातील प्रत्येक राज्यात सत्तेसाठी, ईडीच्या कारवाई पासून वाचण्यासाठी किंवा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती लपविण्यासाठी पक्ष फ ुटी,आमदार- खासदार फुटी मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि हा सर्व प्रकार देशाची १४५ कोटी जनता आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत असुन त्यांच्या भावना दुखावत आहे.देशात वेगवेगळ्या विचारांशी संबंधित वेगवेगळे पक्ष आहेत.यात त्यांची नितीमत्ता,आचार-विचार, पक्षाची बांधिलकी आणि देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रती आपुलकी अशा विविध विचारांनी प्रत्येक पक्ष बांधील असतो. परंतू अलिकडच्या काळात ज्या भाजपाला किंवा भाजपविरोधी पक्षांना एकमेकांचे विचार कधीच पटले नाही ते पक्ष आज फक्त सत्तेसाठी एकमेकांचा पक्ष व आमदार- खासदार फोडतांना दिसतात.आमदार-खासदार फोडल्यानंतर ते सत्ताधाऱ्यांना चालतात,त्यांचे आचार-विचार सुध्दा चालते;कारण या मागचा एकच उद्देश असतो तो म्हणजे सत्तेचा लोभ किंवा विरोधक संपविणे. देशाच्या १४५ कोटी जनतेला कल्पना आहे आमदार-खासदार सत्तेसाठी फुटतात.

परंतु हेच आमदार-खासदार देशाप्रती व देशाच्या जनतेप्रती घेतलेल्या शपथेचा विचार न करता सत्तेच्या लोभापोटी पक्ष बदलवितांना दिसतात ही बाब जगजाहीर आहे.परंतु पक्षांतर्गत कायद्यानुसार आमदार-खासदारांनी पक्ष सोडला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्या-त्या विधानसभा-लोकसभेच्या क्षेत्रात पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात परंतु तसे होतांना अजिबात दिसत नाही ही कसली लोकशाही म्हणावी! सरकार नीट पेपर फ ुटी नंतर दिड ते दोन महिन्यांत परिक्षा घेऊ शकतात तर प्रश्न निर्माण होतो की, फुटलेल्या आमदार- खासदारांच्या निवडणूका याच आधारावर ताबडतोब का घेतल्या जात नाहीत.यावरून स्पष्ट होते की सरकार सत्तेसाठी कोणत्याही स्तरावर जायला तयार आहेत.आमदार हा राज्याचे नेतृत्व करतो तर प्रत्येक खासदार हा देशाचे नेतृत्व करीत असतो आणि प्रत्येक आमदार-खासदार हा स्वतःच्या बळावर निवडून येत नसतो त्यांच्यामागे पक्षाचे पाठबळ ६० टक्के, जनतेचे पाडबळ ३० टक्के व स्वतःचे अस्तित्व १० टक्के अशा पध्दतीने प्रत्येक आमदार-खासदार निवडून येत असतो.परंतु पक्ष सोडतांना आमदार-खासदार या सर्वांना विसरतात व स्वतःला त्या क्षेत्राचा मालक(सर्वेसर्वा) समजतात.कारण त्याला सत्तेचा लोभ असतो.यावरून स्पष्ट होते की, निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी जनतेला व पक्षाला विसरतात. त्यामुळे आमदार-खासदार सत्तेसाठी उंदरासारख्या उड्या मारतांना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांना माझा सल्ला व विनंती आहे की, लोकप्रतिनिधी असतांना आपण पक्ष हमखास सोडावा यात माझा किंवा देशाच्या १४५ कोटी जनतेचा तिळमात्र विरोध नाही. परंतु पक्ष सोडतांना आमदारकी किंवा खासदारकीचा प्रथम राजीनामा द्यावा. कारण जनतेनी लोकप्रतिनिधी निवडून देतांना आपला विश्वास व्यक्तिवर दर्शविला नसतो तर पक्षावर व त्यांच्या माणुसकीवर दर्शविला असतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या स्वार्थासाठी जनतेचा विश्वासघात करू नये.त्यामुळे सर्वप्रथम पक्ष सोडायच्या अगोदर आमदार-खासदारकीचा (लोकप्रतिनिधीचा) राजीनामा दिला पाहिजे.तेव्हाच लोकशाही जिवंत राहिल. सरकारने नीट परीक्षेबाबत देशाच्या २२ लाख ७९ हजार ७४३ विद्यार्थ्यांचा विचार केला आणि नीट पेपर फ ुटल्यानंतर पुन्हा परीक्षा घेतली याचे मन:पासुन स्वागत. परंतु आमदार जेव्हा फुटतो तेव्हा १४ कोटी लोकांच्या भावना दुखावतात आणि जेव्हा खासदार फुटतो तेव्हा देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावना दुखावतात.त्यामुळे सरकारने याबाबतचा गांभीर्याने संग्यान घेऊन हा खेळ खंडोबा थांबविला पाहिजे व फुटलेल्या आमदारांनी राजीनामे राज्यपालांना द्यावे व खासदारांनी राष्ट्रपतींकडे आपले राजीनामे सुपूर्द करावे व या रिक्त पदांच्या जागांवर ताबडतोब निवडणूक घेण्यात याव्यात.अन्यथा फुटलेल्या आमदार-खासदारांना सरकारने सत्तेत घेतले तर लोकशाही धोक्यात येऊ शकते.मी या लेखाद्वारे महामहीम राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय,प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग यांना विनंती करतो की, ज्या प्रमाणे नीट पेपर फुटल्यानंतर काही दिवसातच पुन्हा पेपर घेण्यात आले. त्याच आधारावर फुटलेल्या आमदार- खासदारांच्या मुसक्या आवळण्यासाठी त्यांचे राजीनामे घेवून त्या-त्या विधानसभा-लोकसभा क्षेत्राच्या निवडणुका ताबडतोब घेण्याचे प्रावधान सरकारने ताबडतोब करावे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## फाईल

महत्वाचे फाईलीवरी
साठली इंच इंच धूळ
इच्छा नाही कामाची
हेचि खरे कारण मूळ

हेलपाटेही थकूनगेले
रोजच झाडे पायधूळ
प्रगतीचे आकडे देता
डोळ्यांत फेकताधूळ

कर्मचा-यांच्या डोक्यां
भरी ऐशारामाचे खूळ
फाईलीला लागे मुंग्या
डोक्याचे बनलेवारुळ

विषय संपवून टाकले
भरून एखादाचीचूळ
ना मंजूर करी फाईली
खुस्पटे काढून ढिसूळ

फासांवरी द्याया कुणा
ते तयार ठेवलेले सूळ
मंगलाष्टक म्हणताना
काहीडोक्यावरतांदूळ

कधी अस्वस्थ जनता
उगाचं घाले धुमाकूळ
पाऊलअतिरेक उचले
जेंव्हाहोतात व्याकूळ

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# गणेशमूर्ती विक्री केंद्र अयोग्य ठिकाणी नकोत !



श्री गणेश चतुर्थीला जेमतेम २ महिने शिल्लक राहिल्याने गणेशभक्तांच्या लगबगीला सुरुवात झाली आहे. ज्यांच्या घरी दरवर्षी श्री गणेश विराजमान होतात त्यांच्या तयारीचा पहिला भाग असतो तो श्री गणेशमूर्ती ठरवण्याचा.

त्यादृष्टीने श्री गणेशमूर्ती बनवणारी आणि तयार गणेशमूर्तींची विक्री करणारी विक्रीकेंद्रे शहारासारख्या ठिकाणी उभारली जाऊ लागली आहेत.

ही विक्रीकेंद्रे उभारण्यासाठी मूर्तिकारांना आणि मूर्ती व्यवसायिकांना महापालिकेची परवानगी अनिवार्य असून पालिकेने निर्देशित केलेल्या नियमांचेही पालन करावे लागते. वाहतुकीस आणि रहदारीस अडथळा होणार नाही अशाच ठिकाणी ही विक्रीकेंद्रे उभारण्यास परवानगी मिळत असल्याने काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला केराच्या डब्यांजवळ किंवा नाल्यांवर ही विक्रीकेंद्रे उभारण्यास परवानगी दिली जाते. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असल्याने साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी येणार आहेत. या भावाने श्रद्धाळू त्याच्या स्वागताची आणि मुक्कामाची घरी सिद्धता करत असतो.

आपल्या श्रद्धास्थानाला केराच्या डब्याजवळ किंवा नाल्यावर पाहून कोणत्याही गणेशभक्ताला वाईट तर वाटणारच. श्री गणेशाच्या पार्थिव मूर्तीमध्ये देवत्व हे प्राणप्रतिष्ठापनेनंतर येत असले, तरी गणेशमुर्त्या अशा निषिद्ध स्थळी ठेवणे हा श्रीगणेशाचा अवमानच आहे. त्यामुळे श्री गणेश मूर्तिकारांनी आणि मूर्तीव्यवसायिकांनी अशा अयोग्य ठिकाणी विक्रीकेंद्रे उभारू नयेत. तसेच पालिकेनेही परवानगी देताना या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.

**– जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

## खरीप हंगाम पिक विमा योजनेला सुरुवात!




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** प्रधानमंत्री पिक विमा खरीप हंगाम सन २०२६-२७ साठी पिक विमा योजनेची ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाली असून पोभुर्णा, तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवानी सदर योजनेच्या लाभासाठी ३१ जुलै २०२६ पूर्वी अर्ज करून घ्यावा असे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात येत आहे. चालू वर्षात इफ्को टोकियो इन्शुरन्स कंपनी ही कार्यरत आहे. या योजनेअंतर्गत आपल्या तालुक्यास कापूस,धान, सोयाबीन, तूर ही पिके अधिसूचित केले आहे. या प्रमुख पिका करिता प्रती हेक्टर क्षेत्रासाठी विमा हप्ता निश्चीत करण्यात आला असून अनुक्रमे धान- १३०० रुपये, कापूस १३०० रुपये, सोयाबीन - १२५० रुपये, तूर ९४० रुपये इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

या वर्षी 'एल निनो चा प्रभाव लक्षात घेवून जास्तीत जास्त शेतकर्यांनी अर्ज ऑनलाईन करावा. www.pmfby.gov.in या पोर्टलवर नोंदणी करावा, अर्ज करताना ७/१२, ८/अ, आधारकार्ड, बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र घेऊन जवळच्या सेतू सेवा केंन्द्र, ग्रामपंचायत कार्यालय, कर्जदार शेतकरी यांनी बँकेतून अर्ज करावा. अर्ज करताना फार्मर आयडी असणे अनिवार्य राहील. सुधारित प्रधानमंत्री पिक विमा सन २०२६-२७ अंतर्गत अधिसूचित महसूल मंडळात अधिसूचित पिकाचे चालू वर्षीचे सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास नुकसान भरपाई मिळणार आहे. तरी इच्छुक शेतकर्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्रीमती.स्वाती ढोबळे यांनी केले आहे. अधिक माहिती करिता आपले गावातील सहायक कृषी अधिकारी, यांचेशी संपर्क करावा.

## निर्माता प्रवीण तरडे यांना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार जाहीर




**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१४, पुणे :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्फूर्ती दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमांत निर्माता, अभिनेता प्रवीण तरडे यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे हा पुरस्कार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक आणि पानिपत कादंबरीचे लेखक विश्वासराव पाटील यांच्या हस्ते शनिवार दिनांक १८ जुलै २०२६ रोजी, दुपारी ३ वाजता, पत्रकार भवन, गांजवे चौक, पुणे येथे प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दलाचे दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले.

या कार्यक्रमात मराठी समीक्षाकांना अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आवाका पकडता आला का? या विषयावर विशेष महाचर्चा आयोजित करण्यात आली आहे.

या महाचर्चेत पानिपत कांदबरीकार विश्वासराव पाटील, जेष्ठ पत्रकार अरुण खोरे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन प्रमुख प्रा.डॉ. सुनील भंडगे, विचारवंत प्रा.आसमा शेख हे मान्यवर विचार मांडणार आहे.

याच कार्यक्रमात माणुसकीच्या चळवळीचे संस्थेचे संस्थापक राज देशमुख, नांदेड येथील कवियत्री पंचवटी गोंडाळे यांचा मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे

या कार्यक्रमास साहित्य कला सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच चहात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये 'व्यसनमुक्त पारनेर, सुंदर पारनेर' कार्यक्रम



### व्यसन करायचे असेल तर उज्वल ध्येयाचे : पो.नि.संतोष खेडकर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** आजच्या तरुण पिढीसमोर अनेक प्रकारची प्रलोभने आहेत, परंतु विद्यार्थ्यांनी स्वतःला सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर ठेवून केवळ आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आयुष्यात काही करायचेच असेल, आणि व्यसन करायचेच असेल, तर ते नशिल्या पदार्थांचे नव्हे, तर वाचनाचे व उज्ज्वल ध्येयाचे करा. ध्येयाचे व्यसन तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाईल,असा मोलाचा सल्ला पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी दिला.

देशातील तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने नशा मुक्त भारत अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत स्थानिक न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, पारनेर कनिष्ठ विभाग व्यसनमुक्त पारनेर, सुंदर पारनेर या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर हे होते.

याप्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनीही विद्यार्थ्यांना कायदेविषयक सखोल माहिती दिली. व्यसनाधीनतेमुळे तरुण नकळत गुन्हेगारीकडे कसा वळतो, हे स्पष्ट करताना त्यांनी एक आगळावेगळा सल्ला दिला. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आयुष्यात एकदा तरी जेलला (कारागृहाला) भेट दिली पाहिजे. जेलमधील कैद्यांचे खडतर जीवन, त्यांना मिळणारी कठोर वागणूक आणि तिथला थरार प्रत्यक्ष पाहिल्यानंतर कोणताही सुजाण विद्याथ आयुष्यात कधीही गुन्हा करण्याची हिंमत करणार नाही.

## ११ नगरसेवकांचा दबदबा, पण शिळ-दिवा रोड मात्र खड्ड्यात! नागरिकांचा जीव धोक्यात

### अक्षराजच्या बातमीचा इम्पॅक्ट : महाकालेश्वर, दुर्गा मंदिर येथील खड्डे बुजले



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, दिवा (ठाणे) :** दिवा प्रभाग समितीमध्ये ११ नगरसेवकांचा दबदबा असूनही शिळ-दिवा रोडची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

दैनिक अक्षराज ने दि.०८ जुलै २०२६ रोजी ११ नगरसेवकांचा दबदबा, पण शिळ-दिवा रोड मात्र खड्ड्यात! या मथळ्याखाली सविस्तर बातमी प्रकाशित केली होती.

**बातमीत मांडलेले प्रमुख मुद्दे :**

**१) खड्ड्यांचे हॉटस्पॉट :** सुदामा ग्रील, डम्पिंग रोड, दिवा सर्कल, महाकालेश्वर मंदिर, दुर्गा मंदिर आणि अग्निशामक दल स्थानक या ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य आहे.

**२) अपघाताचा धोका :** रात्री लाईट नसल्याने खड्डे दिसत नाहीत. महाकालेश्वर आणि दुर्गा मंदिर परिसरात शालेय विद्यार्थी पडत आहेत. रोज शेकडो वाहनांचे सस्पेन्शन आणि टायरचे नुकसान होत आहे.

**३) लोकप्रतिनिधींवर प्रश्न :** ११ नगरसेवक रोज याच रस्त्याने ये-जा करतात. तरीही खड्डे दिसत नाहीत का? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला होता.

**अक्षराजच्या बातमीचा इम्पॅक्ट!**

या बातमीची ठाणे महानगरपालिकेने तातडीने दखल घेतली आहे.

१) शिळगावातील महाकालेश्वर मंदिर येथील कॉंक्रीट रस्त्यावर पडलेला मोठा खड्डा कॉंक्रिटीकरण करून बुजवण्यात आला आहे.

२) दुर्गा मंदिराजवळील मोठा खड्डा देखील कॉंक्रिटीकरण करून बुजवण्यात आला आहे.

**अजूनही प्रलंबित :** मात्र सुदामा ग्रील, अग्निशामक दल स्थानकासमोर, दिवा सर्कल आणि डम्पिंग रोड या चार ठिकाणी अजूनही मोठे खड्डे आहेत. हे खड्डे बुजवण्याचे काम ठाणे महानगरपालिका कधी करणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

**नागरिकांची मागणी...**

१) तातडीने संपूर्ण शिळ-दिवा रोडवरील खड्डे बुजवावेत

२) रस्त्याची कायमस्वरूपी डागडुजी करावी

३) अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची हे स्पष्ट करावे

११ नगरसेवक आहेत मग काम कोण करणार? सगळेच एकमेकांकडे बोट दाखवतात, अशी संतप्त प्रतिक्रिया दिवेकर नागरिकांनी दिली आहे.

अक्षराज़ च्या पाठपुराव्यामुळे २ ठिकाणचा प्रश्न सुटला असून, उर्वरित ठिकाणांकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

## उटंबर पोलीस पाटील यांच्या सतर्कतेमुळे ७ वर्षांपूर्वीचा फरार आरोपी गजाआड




**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** कोपरखैरणे पोलीस ठाणे (नवीमुंबई) येथे सन २०१९ मध्ये दाखल झालेल्या फसवणूकीच्या गंभीर गुन्ह्यातील सात वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला उटंबर येथील पोलीसपाटील श्रीकांत नरेश साबळे, यांच्या सतर्कते मुळे अखेर अटक करण्यात यश आले.

कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१६/२०१९ अन्वये भारतीय दंड विधान ४२०,४०६,४६४,व ३४अंतर्गत गुन्हा दाखल असून या प्रकरणातील शाम काशिनाथ सपकाळ, हा फरार होता. दिनांक. ३०जून २०२६ रोजी जा. क्र. ५९६७/२०२६अन्वये उटंबर येथील पोलीसपाटील यांना समंधित पत्र प्राप्त झाले.

गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी बौद्धवाडी (उटंबर डायरा )येथे वास्तव्यास असल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला, उटंबर चे सतर्क पोलीसपाटील यांच्या मदतीने पोलीस दलाचे हेड कॉन्स्टेबल आर. बी. मोहिते, (बकल क्र. ६४३)व पोलीस कॉन्स्टेबल ए. के. करदेकर (बकल क्र. १६१)यांनी संयुक्त कारवाई करून आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

त्यानंतर आरोपीला दापोली पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले पुढील कायदेशीर कारवाई साठी त्याला कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या यशस्वी कारवाई मुळे उटंबर चे पोलीस पाटील श्रीकांत नरेश साबळे यांच्या सतर्कचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेची ५८ वी सभा संपन्न



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, परळ (मुंबई) :** कलगी तुरा लोककला शाहिरी परंपरेतील कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १२ जुलै २०२६ रोजी कुणबी समाजोन्नती संघ, (वाघे हॉल) सेंट झेवियर स्ट्रीट, परळ मुंबई- १२ येथे उपरोक्त संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश ऐनारकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच चिट्टी मालक, सभासद यांच्या बहुसंख्य उपस्थितीत पार पडली.

सरचिटणीस संतोष धारशे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेला सुरुवात करण्यात आली.सदर सभेत सन २०२५-२६ या कालावधीतील सर्व साधारण सभेचे मिनिट्स व कार्य अहवाल वाचन सहसचिव सुधाकर मास्कर यांनी केले. त्याच बरोबर ३१ मार्च २०२६ अखेरचा संस्थेच्या कामकाजाचा अहवाल ताळेबंद व नफा तोटा अहवाल पत्रक खजिनदार सत्यवान यादव यांनी वाचन केले त्यास स्वीकारून सभागृहातून मान्यता देण्यात आली.

त्याच बरोबर संस्थेच्या पुढील वाटचाल आणि हाती घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर चर्चा करुन सभागृहातून सकारात्मक अशी मान्यता मिळाली आहे. सदर सभेला उपस्थित चिठ्ठीमालक, सभासद, शाहीरवर्गाचे सहसचिव दिलीप नामे यांनी आभार व्यक्त करुन सभेची सांगता केली.

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

### झाडे लावा, झाडे जगवा ; पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी – प्रताप सरनाईक



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या अभियानाच्या माध्यमातून राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे. वाढते जागतिक तापमान, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बनडाय ऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, असेही त्यांनी सांगितले.

एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे. त्यामुळे समाजहिताचे आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे ही देखील एसटीची सामाजिक बांधिलकी असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

वृक्षारोपण करून जबाबदारी संपत नाही, तर प्रत्येक रोप जगविणे, त्याचे संगोपन करणे आणि संरक्षण करणे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी एक कर्मचारी – एक वृक्ष आणि एक नागरिक – एक वृक्ष हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारावा असे आवाहन केले. एसटीच्या प्रत्येक आगारात, बसस्थानकात आणि कार्यालय परिसरात हिरवाई निर्माण करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि प्रवाशांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले.

७८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करताना, निसर्गाचे संरक्षण म्हणजे मानवजातीचे संरक्षण असल्याचे अधोरेखित करून हरित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# टाकळी ढोकेश्वरमध्ये घडले हिंदू - मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## वै.बबन महाराज पायमोडे यांच्या दिंडीचे दर्ग्यात स्वागत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** हिंदू - मुस्लिम ऐक्याची परंपरा असणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै.ह.भ.प. बबन महाराज पायमोडे यांच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मुस्लिम बांधवांनी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा दर्गाह येथे या दिंडीचे उत्साहात स्वागत केले. यावेळी दिंडी रथावर पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला. दिंडी चालकांच्या वतीने बाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली.

मुस्लिम जमातचे अध्यक्ष अशपाक हवलदार यांनी सर्वांचे स्वागत केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक तथा पत्रकार चाँद शेख यांनी या उपक्रमाचे विवेचन करताना दिंडी पारंपरेतील हिंदू - मुस्लिम ऐक्याची विविध उदाहरणे देत दरवर्षी दिंडी स्वागताची प्रथा जपली जाणार असल्याचे सांगितले.



**दोन महानुभाव मित्रांची गळाभेट**

वै.ह.भ.प बबन महाराज पायमोडे व पैगंबरवासी हजरत सुफी इस्माईल शहा बाबा हे लहानपणापासून सवंगडी होते. या उपक्रमाने वारकरी संप्रदाय व सुफी संप्रदायातील या मित्रांची जणू गळाभेट झाली. यावेळी पावसासाठी हिंदू - मुस्लिम बांधवांनी सामूहिक प्रार्थना केली.

वारकरी व सुफी संप्रदाय यात अनेक समान दुवे असून हे दोन्ही पंथ समानतेची व मानवतेची शिकवण देताना कर्मकांडाला थारा देत नाहीत. या दोन्ही संतांच्या या गळाभेटीने हिंदू - मुस्लिम एकतेचे धागे अधिक घट्ट बांधले गेले असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी सरपंच अरुणाताई खिलारी, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय उदावंत, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, दिंडी चालक रवींद्र पायमोडे, शंकर रांधवण अशोक झावरे, ग्रा.पं.सदस्य भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनावळे, संकेत झावरे, मळीभाऊ रांधवण, अंकुश पायमोडे, रावसाहेब झावरे, संदीप खिलारी, शिराजभाई हवलदार, चाँदशेठ इनामदार, बशीरभाई हवलदार, आदमभाई हवलदार, मुजावर उस्मानभाई, राजू शेख, साजिद पटेल, सद्दाम इनामदार, छोटूभाई हवलदार, अल्ताफ शेख, निसार शेख, आमीन पिंजारी, हर्षब मुजावर, रमजान शेख, अफसर शेख, सोहेल हवालदार, निहाल हवालदार, शाहिद शेख,फैजान मोमीन, अब्दुल हवालदार, हाफिजी सुलेमान पटेल आदींसह ग्रामस्थ, वारकरी व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजिजभाई हवलदार यांनी आभार मानले.

# वाघुंडे बुद्रुक येथे महिला बचतगटांना २५ लाखांचे कर्ज वाटप; महिला सक्षमीकरणाला नवी दिशा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वाघुंडे बुद्रुक येथे आयोजित कार्यक्रमात ९ महिला बचत गटांना एकूण २५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. हे कर्ज सोशल सेंटर व नाबार्ड यांच्या माध्यमातून मिळाले बँक ऑफ महाराष्ट्राने कर्ज दिले आहे या कर्जाला २५ टक्के सबसिडी मिळाली आहे. या उपक्रमामुळे गावातील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी तसेच विविध लघुउद्योग व व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठे आर्थिक बळ मिळाले आहे.

महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या राजेश्वरी कोठावळे-दिवटे यांनी या कर्जप्रकरणी विशेष पाठपुरावा केला. तब्बल १० वर्षांपासून महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राजेश्वरी कोठावळे-दिवटे यांच्या प्रयत्नांमुळे विविध बचत गटांना बँकांकडून कर्ज मंजूर होऊन त्याचे वितरण शक्य झाले. त्यांच्या या कार्याबद्दल महिलांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमात अष्टविनायक, गणराज, समर्थ, सावता माळी, स्वामिनी, श्री स्वामी समर्थ, राधाराणी, शिव पार्वती आणि क्रांती ज्योती या महिला बचत गटांना कर्जाचे वाटप करण्यात आले. या कर्जाच्या माध्यमातून महिलांना किरकोळ व्यवसाय, दुग्धव्यवसाय, शेतीपूरक उद्योग, गृहउद्योग तसेच इतर उत्पन्नवाढीच्या उपक्रमांना चालना देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.



महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय कुटुंब आणि गावाचा विकास होऊ शकत नाही. या कर्जाच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला स्वतः च्या पायावर उभे राहण्याची संधी मिळेल. बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन व्यवसाय वाढवावा, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.

**- राजेश्वरी कोठावळे -दिवटे**

कार्यक्रमाला सोशल सेंटरच्या नलिनी मॅडम, सोशल सेंटर व नाबार्ड संस्थेच्या सविता ढवळे, बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक राकेश सर, अविनाश सर, पठण सर तसेच दौंड मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी महिला बचत गटांच्या कार्याचे कौतुक करताना बचत, शिस्त आणि सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर महिलांनी आर्थिक प्रगती साधल्याचे सांगितले. तसेच अशा उपक्रमांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत असून महिलांचा समाजातील सहभाग अधिक प्रभावी होत असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी अनेक महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहारांचे ज्ञान मिळाल्याचे तसेच व्यवसाय उभारणीसाठी आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले. कर्जामुळे रोजगारनिर्मितीबरोबरच कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# स्व.शंकरराव चव्हाण यांच्या १०६ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

## आरोग्य शिबिरात २५० रुग्णांची मोफत तपासणी; गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटप

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.शंकरराव चव्हाण यांची १०६ वी जयंती शंकरराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय व शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी आरोग्य शिबिर, वृक्षारोपण आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविम कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव गणेश चिखले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मिनाक्षी तागडे, कोशिश फाउंडेशनचे संयोजक कपिल वानखेडे, ईश्वर ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य निकिता रामटेके, संध्या ठाकरे, यामिनी घोडमारे, किशोर बक्सरिया, मुख्याध्यापिका विना पांडे, रजनी वाहने, विद्या कसारे, डॉ.फिरोज अन्सारी, डॉ. सचिन गोडबोले, आदिती वाढीवे, सरिता दुकाती आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात स्व. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व द्वीप प्रज्वलन करून करण्यात आली.

याप्रसंगी सरपंच मिनाक्षी तागडे, कोशिश फाउंडेशनचे संयोजक कपिल वानखेडे आणि मुख्याध्यापिका विद्या कासरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. वरून हॉस्पिटल मल्टीस्पेशालिटी व कोशिश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्याचे निशुल्क वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी स्व. शंकरराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या शंकरराव चव्हाण हे अत्यंत शिस्तप्रिय नेते होते. केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक महत्त्वाचे व धाडसी निर्णय घेतले. विशेषतः शिक्षण आणि जलसिंचन क्षेत्रात त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश चिखले यांनी शंकरराव चव्हाण एक महान नेते होते, त्यांनी लावलेली शिस्त व आजच्या तरुण पिढीने त्यांचा आदर्श



डोळ्यासमोर ठेऊन कार्य ठेऊन राष्ट्र उभारण्यासाठी कार्य करावे असे आवाहन केले. यावेळी इतर मान्यवरांनी त्यांच्या जीवन प्रवासावर विस्तृत प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत मोहोड यांनी केले, संचालन केशव तभाने यांनी तर आभार नीरज मिश्रा यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन कोरडे, चंद्रकांत गायकवाड, प्रविण साबळे, राजेंद्र गूळरांधे, संगीता राऊत, उमेश झाडे, नरेंद्र बुटोलिया, प्रमोद इंगळे, अनिल भास्कर, सुरेखा चिखले, पुष्पा बढिये, गीता जालंदर, मनीषा सिंगनजुडे, सुनील जालंदर, अभय मिश्रा, भोला बक्सरिया, किशोर निकोसे आणि शोभा घोडीले यांनी सहकार्य केले.

# पीक विमा योजनेसाठी दि. ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१४, शिरपूर (धुळे) :** केंद्र सरकारच्या सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप २०२६-२७ हंगामासाठी धुळे जिल्ह्यातील शेतकर्यांना पीक विमा भरावा असे आवाहन शिरपुरचे तालुका कृषी अधिकारी कैलास गोपाळ यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३१ जुलै २०२६ आहे. या सुधारित योजनेत अन्नधान्य पिकांसाठी २ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के शेतकरी हिस्सा (प्रीमियम) निश्चित करण्यात आला आहे. विमा संरक्षणासाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी प्राप्त करणे आणि 'ई-पीक पाहणी' करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच, अर्ज करताना आधार कार्ड लिंक असलेला मोबाईल नंबर जवळ असणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकर्यांनी आधार कार्ड, सातबारा उतारा, भाडेपट्टी करार किंवा संमती पत्र (भाडेकरू शेतकर्यांसाठी), पीक पेरा स्वयंघोषणा पत्र, बँक पासबुक आणि ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी हे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. तरी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकर्यांनी मुदतीत आपली कागदपत्रे सादर करून पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिरपूर तालुका कृषी अधिकारी कैलास गोपाळ यांनी केले आहे.

**प्रमुख पिकांचे विमा संरक्षण (प्रति हेक्टर) :**

एचडीएफसी अंर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत राबविल्या जाणार्या या योजनेत प्रामुख्याने खालीलप्रमाणे विमा संरक्षण आणि शेतकरी प्रीमियम रक्कम निश्चित केली आहे.

भुईमूग - विमा संरक्षण रु. ४५,००० (प्रीमियम रु. ११२), सोयाबीन - विमा संरक्षण रु. ६३,५०० (प्रीमियम रु. १५६)

मका - विमा संरक्षण रु. ४०,००० (प्रीमियम रु. ४००), बाजरी - विमा संरक्षण रु. ३२,००० (प्रीमियम रु. ८०), मूग - विमा संरक्षण रु. ३,०००० (प्रीमियम रु. ६००)

उडीद - विमा संरक्षण रु. २७,००० (प्रीमियम रु. ५४०), तूर - विमा संरक्षण रु. ४७,००० (प्रीमियम रु. ११७), कापूस - विमा संरक्षण रु. ६२,५०० (प्रीमियम रु. २०४७)

कांदा - विमा संरक्षण रु. ७५,००० (प्रीमियम रु. १८७) एकुण -३८२

## थोडक्यात बातम्या

### पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा - आ.पाटील



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१४, पेण (रायगड) :** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि नागरिकांना शुद्ध प्राणवायू मिळण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने हाती घेतलेला हा उपक्रम स्तुत्य असून, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी प्रत्येकाने 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संकल्प प्रत्यक्षात उतरवावा, असे आवाहन आमदार रवीशेठ पाटील यांनी केले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत पेण येथील रामवाडी एसटी विभागीय कार्यालय परिसरात आमदार रवीशेठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संदीप पाटील, सुहास कांबळे, अपर्णा वर्तक, रोहिदास कांबळे, मनीषा पाटील यांच्यासह एसटी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आमदार रवीशेठ पाटील यांनी स्वतः वृक्षारोपण करून प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे नियमित संगोपन करण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि घटते हरित क्षेत्र लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. तसेच लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन करून ते वृक्षात रूपांतरित करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवून पर्यावरण संवर्धनासाठी अधिकाधिक नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

### भोरखेडा पटेल विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन संपन्न



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१४, शिरपूर (धुळे) :** आर.सी.पटेल माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा येथे जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोरखेडा कॉलेजचे प्राचार्य सी.एन.पाटील होते. प्रमुख वक्ते म्हणून एस.पी.डी.एम. कॉलेजचे भूगोल विषय तज्ज्ञ डॉ.सुनील गोराणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक एस.डी.पाटील होते.विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तद्नंतरप्रमुख वक्त्यांनी 'वाढती लोकसंख्या व उद्भवणाऱ्या समस्या' या विषयावर मार्गदर्शन केले. तत्पूर्वी दोन गटात निबंध स्पर्धा पार पडली. इयत्ता ८ वी ते १० वी च्या लहान गटाला 'लोकसंख्या वाढीचा भस्मासुर' व इयत्ता ११ वी व १२ वी च्या मोठ्या गटाला 'कुशल लोकसंख्या देशाची प्रगती' हे विषय देण्यात आले होते.दोन्ही गटात एकूण ७० विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत भाग घेतला होता. त्यात लहान गटात प्रथम पाटील राजेश्वरी हुकुमचंद, द्वितीय श्रीराव गुंजन उद्यम तृतीय विभागून सोनवणे लावण्या जितेंद्र व गुजर जान्हवी जगदीश, उत्तेजनार्थ लतिका श्रीराम पाटील यांचे क्रमांक आले. तर मोठ्या गटात प्रथम अरुण कैलास शिरसाठ द्वितीय विभागून जान्हवी शिवदास जाधव व दर्शन प्रदीप कोळी तृतीय विभागून भार्गवी मुकेश करंकाळ व निता शालिक शिरसाठ तसेच उत्तेजनार्थ दीपिका कन्हैयालाल पवार यांनी मिळवले. निबंध स्पर्धेचे परीक्षण प्रा. व्ही.एस.इशी व एम.जी. वाडीले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.पी.टी.चौधरी यांनी केले. एम.जी.वाडिले यांनी सूत्रसंचालन केले. तर एस.एम.पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आर.पी.देवरे, पी.टी.चौधरी, एस.एम.पाटील, व्ही.एस.इशी, एस.आर.देसले, पी.एस.परदेशी,एस. जी.भावसार, एन.बी.पाटील, निकुंभे सर, चंदन पावरा, सुनील पावरा, आफ्रिद पटेल, ए.बी.वाल्हे, ऐश्वर्या मोराणकर, रुपाली तिरमले, मिनाक्षी जैन, ए.डी.पाटील, दिलीप अहिरे, विवेकानंद पाटील, अनिल खुटे, शांतीलाल शिरसाठ यांचे सहकार्य लाभले.

### उपमुख्यमंत्री यांना अल्पसंख्यांक समाजाच्या विविध प्रश्नांवर निवेदन



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१४ :** राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्यांक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांची मुंबई येथे सामाजिक कार्यकर्ते वहीद पटेल यांनी सदिच्छा भेट घेऊन अल्पसंख्यांक समाजाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी समाजहिताचे विविध मुद्दे मांडणारे निवेदन उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे सादर केले. भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी हसतमुखाने स्वागत करत, ह्मम... आज क्या लाए हो, पटेल? अच्छे विषय लाते हो... असे म्हणत निवेदन स्वीकारले.

या प्रसंगामुळे वातावरण अधिक आत्मीय झाले. वहीद पटेल यांनी 'मार्टी' (MARTI) संस्था तातडीने कार्यान्वित करणे, 'अमृत' (AMRUT) संस्थेच्या विविध योजनांमध्ये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक वगळले जात असल्याचा मुद्दा, तसेच मौलाना आझाद महामंडळाच्या कर्ज प्रकरणातील अडचणी दूर करण्याची मागणी या महत्त्वाच्या विषयांवर उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.यावर सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात येतील, तसेच मांडलेल्या सर्व विषयांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी वहीद पटेल यांनी सांगितले की, समाजहिताचे प्रश्न केवळ मांडून थांबून चालत नाही; त्यांचा सातत्याने पाठपुरावा केल्यासच सकारात्मक निर्णय मिळू शकतो. अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी माझा संघर्ष पुढेही सुरू राहील. या भेटीमुळे अल्पसंख्यांक समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक हालचाली होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.